# गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

(महाराष्ट्र शासन अधिसूचना क्रमांक २००७/(३२२/०७) विशि –४ महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४ (१९९४ चा महा.३५) च्या कलम ३ च्या पोटकलम (२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर, २०११ रोजी स्थापित व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ (सन २०१७ चा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम क्रमांक ६ ) व्दारा संचालित राज्य विद्यापीठ )

## कुलसचिवांचे कार्यालय

डॉ. अनिल हिरेखन
कुलसचिव
गोंडवाना विद्यापीठ,गडचिरोली.

एम.आय.डी.सी. रोड कॉम्प्लेक्स गडचिरोली –४४२६०५(महा.)
फोन:07132.216554, 223104 फॅक्स : 07132.22265
Email : gug.registrar@gmail.com
web: https://www.unigug.ac.in

जा.क्र/गोंवीग/~~प्रवमुमं~~/ 3334/२०२६ फु.स.का.        दिनांक: १५/०५/२०२६

प्रति,

मा. प्राचार्य, विद्यापीठाशी संलग्नित सर्व महाविद्यालये, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
मा. विभागप्रमुख, विद्यापीठाचे पदव्युत्तर शैक्षणिक विभाग, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

**विषय:–** विद्यार्थ्यांचे १२ अंकी APPAR ID व डिजीलॉकर (Digilocker) नोंदणी करण्याबाबत.

**संदर्भ :–** १) मा. संचालक, उच्च शिक्षण विभाग, शिवाजी नगर, पुणे –४११०१६, महा. शासन यांचे पत्र जा क्र. उशिसं/जीवन शैली बदलाबाबत/मवि–१/२०२६/ई/६८६ दि. १३/०५/२०२६

**महोदय,**

उपरोक्त संदर्भाकित विषयान्वये आपणास कळविण्यात येते की, राष्ट्रीय शैक्षणिक धोरण (NEP) 2020 अंतर्गत विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीचा मागोवा घेण्यासाठी 'एक राष्ट्र, एक विद्यार्थी ओळख' (One Nation, One Student ID) या संकल्पनेतून APAAR (Automated Permanent Academic Account Registry) आणि Academic Bank of Credits (ABC) प्रणाली कार्यान्वित करण्यात आली आहे. या संदर्भात शिक्षण मंत्रालय, भारत सरकार आणि विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली (UGC) यांनी खालीलप्रमाणे अनिवार्य तरतुदी केल्या आहेत.

१) **अपार आयडीची अनिवार्यता:** प्रत्येक विद्यार्थ्याने स्वतःचा १२ अंकी 'अपार आयडी' तयार करणे आणि तो आधार कार्ड व डिजीलॉकरशी लिंक करणे अनिवार्य आहे.

२) **क्रेडिट अपलोड करण्याची मुदत:** प्रत्येक शैक्षणिक वर्षाचा प्रलंबित श्रेयांक (Credits) डेटा त्या त्या वर्षाच्या 31 डिसेंबर अखेरपर्यंत 'ABC' पोर्टलवर अपलोड करणे बंधनकारक आहे.

३) **नवीन मुदत (2026 परीक्षा):** सन 2026 मध्ये घेतलेल्या सर्व परीक्षांचा व मूल्यमापनाचा श्रेयांक (Credits) डेटा विद्यार्थ्यांच्या 'अपार आयडी'शी मॅप करून जून 2026 पर्यंत पोर्टलवर अपलोड करणे आवश्यक आहे. या मुदतीनंतर पोर्टलवरील डेटा गोठविला (Freeze) जाईल आणि त्यात कोणताही बदल करता येणार नाही.

४) **डिजीलॉकर नोंदणी:** विद्यार्थ्यांची सर्व शैक्षणिक प्रमाणपत्रे आणि श्रेयांक (Credits) सुरक्षित ठेवण्यासाठी डिजीलॉकरवर नोंदणी असणे आवश्यक आहे.

**उपरोक्त बाबींचा विचार करता आपणस खालील प्रमाणे निर्देश देण्यात येत आहेत..**

१) **आपल्या महाविद्यालय/विभागातील शिकत असलेल्या व परीक्षा (regular/repeater) देत असलेल्या प्रत्येक विद्यार्थ्यांची APAAR ID नोंदणीचे १००% काम पूर्ण करून तसा अहवाल या कार्यालयात सादर करावा.**

२) **सत्र २०२६-२७ प्रवेश तसेच हिवाळी २०२६ च्या सर्व परीक्षांचे परीक्षा आवेदन पत्र APAAR ID व Digilocker वर नोंदणी असल्याशिवाय स्वीकारल्या जाणार नाहीत.**

३) **आपल्या महाविद्यालयात/विभागात शिकत असलेल्या व परीक्षा (regular/repeater) देत असलेल्या किती विद्यार्थ्यांनी APAAR ID व Digilocker वर नोंदणी केलेली आहे ह्याचा अभ्यासक्रम निहाय संपूर्ण तपशील दिनांक १८/०५/२०२६ पर्यंत सादर करावा.**

कुलसचिव
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

प्रतिलिपी माहीतीस:—
१) मा. कुलगुरू महोदयांचे स्विय सहाय्यक, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
२) मा. प्र. कुलगुरू महोदयांचे कार्यालय, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

# महाराष्ट्र शासन
## उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य
### ४१२ ई, बहिरट पाटील चौक, मॉडेल कॉलनी, शिवाजीनगर, पुणे- ४११ ०१६

Web : www.dhepune.gov.in E-Mail : mavi.dhepune@gov.in

फोन नं.०२०/२६१२२११९


क्र. उशिसं/जीवन शैली बदलाबाबत/मवि-१/२०२६/ई /1686 दि.१३.५.२०२६

**अत्यंत महत्त्वाचे / कालबद्ध** **13 MAY 2026**

प्रति,

सर्व कुलसचिव,
राज्य सार्वजनिक विद्यापीठे,
महाराष्ट्र राज्य.

विषयः विद्यापीठे व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचे 'अपार' (APAAR ID) व 'डिजीलॉकर' (DigiLocker) नोंदणी तसेच क्रेडिट डेटा अपलोड करण्याबाबत

संदर्भः 1. उच्च शिक्षण विभाग, शिक्षण मंत्रालय, भारत सरकार यांचे डी.ओ. पत्र क्र. १६-५/२०२०-TEL-Part (४) दि. 07.11.2024.
2. विद्यापीठ अनुदान आयोग (UGC), नवी दिल्ली यांचे परिपत्रक क्र. F. १-५०/२०२१ (ABC/NAD) दि. 07.08.2024.
3. उच्च व तंत्र शिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन आणि संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी वेळोवेळी निर्गमित केलेली परिपत्रके.

उपरोक्त विषयान्वये आपणास कळविण्यात येते की, राष्ट्रीय शैक्षणिक धोरण (NEP) 2020 अंतर्गत विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीचा मागोवा घेण्यासाठी 'एक राष्ट्र, एक विद्यार्थी ओळख' (One Nation, One Student ID) या संकल्पनेतून APAAR (Automated Permanent Academic Account Registry) आणि Academic Bank of Credits (ABC) प्रणाली कार्यान्वित करण्यात आली आहे. या संदर्भात शिक्षण मंत्रालय, भारत सरकार आणि विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली (UGC) यांनी खालीलप्रमाणे अनिवार्य तरतुदी केल्या आहेतः

- अपार आयडीची अनिवार्यताः प्रत्येक विद्यार्थ्याने स्वतःचा 12 अंकी 'अपार आयडी' तयार करणे आणि तो आधार कार्ड व डिजीलॉकरशी लिंक करणे अनिवार्य आहे.
- क्रेडिट अपलोड करण्याची मुदतः प्रत्येक शैक्षणिक वर्षाचा प्रलंबित श्रेयांक (Credits) डेटा त्या त्या वर्षाच्या 31 डिसेंबर अखेरपर्यंत 'ABC' पोर्टलवर अपलोड करणे बंधनकारक आहे.
- नवीन मुदत (2026 परीक्षा): सन 2026 मध्ये घेतलेल्या सर्व परीक्षांचा व मूल्यमापनाचा श्रेयांक (Credits) डेटा विद्यार्थ्यांच्या 'अपार आयडी'शी मॅप करून जून 2026 पर्यंत पोर्टलवर अपलोड करणे आवश्यक आहे. या मुदतीनंतर पोर्टलवरील डेटा गोठविला (Freeze) जाईल आणि त्यात कोणताही बदल करता येणार नाही.
- डिजीलॉकर नोंदणीः विद्यार्थ्यांची सर्व शैक्षणिक प्रमाणपत्रे आणि श्रेयांक (Credits) सुरक्षित ठेवण्यासाठी डिजीलॉकरवर नोंदणी असणे आवश्यक आहे.

विद्यापीठांनी करावयाची कार्यवाहीः

1. आपल्या कार्यक्षेत्रातील सर्व संलग्न महाविद्यालये, स्वायत्त संस्था आणि पदव्युत्तर विभागांना विद्यार्थ्यांची 100% अपार आयडी नोंदणी पूर्ण करण्याचे निर्देश द्यावेत.
2. प्रवेश प्रक्रिया आणि परीक्षा अर्ज भरताना 'अपार आयडी' अनिवार्य करावा.
3. विहित मुदतीत क्रेडिट डेटा अपलोड न झाल्यास त्याची सर्वस्व जबाबदारी संबंधित शैक्षणिक संस्थेची राहील याची नोंद घ्यावी.

आपल्या कार्यक्षेत्रातील किती महाविद्यालये/विद्यापीठे/उच्च शैक्षणिक संस्थांमधील किती विद्यार्थ्यांनी APAR ID ची नोंदणी पूर्ण केली आहे याचा संपूर्ण तपशील तात्काळ संचालनालयास mavi.dhepune@nic.in या इमेलवर सादर करण्यात यावा. तरी, केंद्र सरकार आणि महाराष्ट्र शासनाच्या या महत्त्वाकांक्षी प्रकल्पाची गांभीर्याने दखल घेऊन, आपल्या स्तरावरून तातडीने कार्यवाही करण्यात यावी.

(डॉ. शैलेंद्र देवळाणकर)
प्र.शिक्षण संचालक (उच्च शिक्षण)
महाराष्ट्र राज्य, पुणे -१६

प्रत: मा. स्वीय सहाय्यक, मा. मंत्री उच्च व तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई 32.
मा. अपर मुख्य सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई 32.